**प्रेस नोट** **ता. ०८/०९/२०१८**

## कॉलेज समोरील टवाळखोरावार हडपसर पोलीसांकडुन कारवाई

हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांचेकडे पोलीस स्टेशन हददीतील शाळा, कॉलेज मध्ये व परिसरात टवाळखोर मुले हे मुलींची छेडछाड करुन, शाळा कॉलेजमधील मुलींना त्रास देत असलेबाबत शिक्षकानी व पालकांनी समक्ष येवुन सांगितल्याने मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो, परि-५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली व मा. मिलींद पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, वानवडी विभाग पुणे यांचे नेतृत्वाखाली व सुचनानुसार हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांनी टवाळखोरांवर आळा घालण्याकरीता तीन पथक तयार करण्यात आली होती.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांचे सुचनेनुसार सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण यांचे पथकांनी हडपसर पोलीस स्टेशन हददीतील साधना शाळा व कॉलेज, आण्णासाहेब मगर कॉलेज, एस. एम. जोशी कॉलेजच्या परिसरामध्ये शाळा व कॉलेज सुटण्याच्या वेळेस बारकाईने पाहणी केली असता काही टवाळखोर मुले हे कॉलेजच्या परिसरामध्ये मोटार सायकलवरुन काही कारण नसताना मुलींची टिंगल टवाळी करण्याच्या उददेशाने फिरत असल्याचे दिसुन आले.

काल दिनांक ०७/०९/२०१८ रोजी सकाळी १०.०० ते सांयकाळी ०५.०० वाजण्याचे दरम्यान साधना शाळा व कॉलेज, आण्णासाहेब मगर कॉलेज, एस. एम. जोशी कॉलेजच्या परिसरामध्ये सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, सहा. पोलीस निरीक्षक प्रमोद लोणारे, पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे, पोलीस हवा, युसुफ पठाण, राजेश नवले, संपत औचरे, पोलीस नाईक राजु वेगरे, प्रमोद टिळेकर, सैदोबा भोजराव, विनोद शिवले, पोलीस शिपाई नितीन मुंढे, अकबर शेख, नामदेव बंडगर, प्रशांत टोणपे, गोविंद चिवळे यांनी टवाळखोरी करणाऱ्या एकुण २८ मुलांना त्यांचेकडील मोटार सायकली सह त्यांना हडपसर पोलीस स्टेशन येथे आणुन त्यापैकी प्रौढ २२ मुलांवर महाराष्ट्र पोलीस कायदयान्वये कारवाई केली व त्यांचे मोंटार सायकलीवर मोटार वाहन कायदया प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे व ६ मुलांना (कमी वयाच्या) त्यांचे पालकांचे ताब्यात देवुन त्यांना योग्य ती समज देण्यात आली आहे. तसेच प्रौढ मुलांचे देखील पालकांना हडपसर पोलीस स्टेशन पुणे येथे बोलावुन त्यांचे अपत्यावर देखरेख ठेवणेकरीता योग्य समज वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांनी दिली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांनी हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीतील सर्व शाळा व कॉलेज यांना शाळा कॉलेजमध्ये अशा प्रकारच्या टवाळखोरी करणाऱ्या मुलांवर या नंतर हि अशा प्रकारची कारवाई करण्यात येणार असलेबाबतचे संकेत दिले आहेत. तसेच अशा प्रकारच्या काही तक्रारी असतील तर त्याबाबतची माहिती तात्काळ हडपसर पोलीस स्टेशन पुणे येथे कळवावी असे आवाहन केले आहे.